International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly
ISSN – 2347-7075
Impact Factor – 0.899
Vol.2 No.2 Nov - Dec 2014

# राजर्षी शाहू महाराजांचे शैक्षणिक कार्य : एक अभ्यास

**विशाल सर्जेराव घोलप**

*एम.ए., एम.एस्सी. (भूगोल)*

*शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.*

**प्रस्तावना:**

राजर्षी शाहू छत्रपतींची राजकीय कारकिर्द २ एप्रिल १८९४ ते ६ मे १९२२ वर्षे म्हणजे एकूण २८ वर्षाची होती. परंतु या २८ वर्षाच्या कारकिर्दीत त्यांनी कोल्हापूर व महाराष्ट्रातील सामाजिक त्याचप्रमाणे आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या समाजाच्या विकासासाठी त्यांनी अनन्य असे कार्य केले होते. त्यांच्या सामाजिक क्रांतीमुळे जनसामान्यांच्या जीवनात आमुलाग्र परिवर्तन झाले. पण त्यांचा ते विकासही करु लागले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी राजर्षी शाहू महाराजाच्या कार्याचा उल्लेख करताना म्हणाले की, ‘‘भारतीय सामाजिक लोकशाहीचा आधारस्तंभ’ म्हणजे शाहू महाराज होय.

**कोल्हापूर संस्थेचा इतिहास:**

१७ व्या शतकात कोल्हापूर हा मराठा राज्याचा भाग छत्रपती शिवाजी महाराजाच्या काळात बनला. १८ व्या शतकाच्या प्रारंभी कोल्हापूर स्वतंत्र राज्य उदयास आले. त्याचप्रमाणे सन १७१० मध्ये कोल्हापूर राज्याची स्थापना महाराणी ताराबाई यांनी केली. तसेच २० व्या शतकात कोल्हापूर सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक आणि कलाकुसरीच्या दृष्टीने महत्त्वाचे केंद्र म्हणून उदयास आले.

बाबासाहेब महाराजांना १८६४ मध्ये कारभाराची मुखत्यारी देण्यात आली पण मुखत्यारी मिळाल्यावर अवघ्या दोन वर्षाच्या आतच ते मरण पावले. त्यांच्यानंतर त्या गादीवर राजाराम महाराज ते अल्पवयीन असल्याने कोल्हापूरचा पूर्ण कारभार इंग्रजांच्या हाती गेला. त्याचप्रमाणे १९७० मध्ये राजाराम महाराज युरोपच्या दौऱ्यावर असताना इटलीतील फ्लॉरिन्स मध्ये त्यांचा मृत्यू झाला. पुढे १८७१ मध्ये चौथे शिवाजी महाराज गादीवर आले. तेव्हा त्यांचे वय ९ वर्षाचे होते. म्हणजेच त्यावेळी कोल्हापूरचा पूर्ण राज्यकारभार इंग्रज अधिकारी चालवत होते. त्याचवेळी दिवाणपदी माधवराव बर्वेची नेमणूक झाली. महाराजाचे व बर्वेचे राज्यकारभारात पटेनासे झाले. लवकरच चौथे शिवाजी महाराज यांना अहमदनगरच्या किल्ल्यात डांबण्यात आले. त्यामुळे तेथेच त्यांचा मृत्यू सन १८८३ साली झाला. सन १८८२ पासून

कोल्हापूरचा राज्यकारभार पाहण्यासाठी 'रीजन्सी कौन्सील' ची स्थापना करण्यात आली. त्यामुळे रीजन्स कौन्सिलचे 'रीजंट' म्हणून कागलच्या आबासाहेब घाटगे यांची नेमणूक करण्यात आली.

**शाहू महाराजांचा जन्म व शिक्षण:**

शाहू महाराजांचा जन्म २६ जुलै १८७४ मध्ये कागलच्या घाटगे घराण्यात झाला. त्यांच्या पित्याचे नाव श्रीमंत जयसिंगराव उर्फ आबासाहेब घाटगे होय. त्याचप्रमाणे त्यांच्या आईचे नाव राधाबाईसाहेब हे होते. शाहू महाराजांचे मूळ नाव यशवंतराव तर त्यांच्या धाकट्या बंधूचे नाव पिराजीराव उर्फ बापूसाहेब होय. सन १८८४ मध्ये चौथे शिवाजी महाराज यांच्या पत्नी महाराणी आनंदीबाईसाहेब यांनी यशवंतराव यांना दत्तक घेतले त्यावेळी त्यांचे नाव शाहू छत्रपती असे ठेवले होते.

शाहू महाराजांचे शिक्षण हे राकोट येथील 'राजकुमार कॉलेज' मध्ये झाले. त्यावेळी तेथील प्राचार्य मॅकनॉटन सर यांच्या नजरेखाली १८८९ पर्यंत त्यांचे शिक्षण पूर्ण झाले. इ.स. १८९० ते १८९४ या कालावधीत फ्रेजर सर यांच्या देखरेखीखाली शाहू महाराजांना शिक्षण देण्यात आले. महाराजांनी इंग्रजी भाषा, राज्यकारभार आणि जगाच्या इतिहासाचे खूप अध्ययन केलेले दिसून येते.

**राज्यकारभार अधिकार ग्रहण:**

कोल्हापूरच्या राज्यकारभाराची सत्ता राजर्षी शाहू महाराजांनी २ एप्रिल १८९४ रोजी हाती घेतली. त्यावेळी त्यांनी प्रजेला उद्देशून केलेल्या भाषणात ते म्हणाले की, ''आमची सर्व प्रजा सतत तृप्त राहून सुखी असावी, तिच्या कल्याणाची सतत वृद्धी व्हावी आणि आमचे संस्थानची प्रत्येक प्रकारे सदोदित भरभराट व्हावी अशी आमची इच्छा आहे. हा आमचा हेतू परिपूर्ण करण्यास आमच्या पदरचे सर्व लहानथोर जहागिरदार, आप्त सरदार, मानकरी, इनामदार, कामगार, व्यापारी आदि तमाम प्रजाजन शुद्ध अत: करणापासून मोठ्या राज्यनिष्ठेने आम्हास सहाय्य करतील अशी आमची पूर्ण उमेद आहे. ही आमची उमेद/कारकिर्द दीर्घ काळापर्यंत चालवून यशस्वी करावी अशी मी त्या परमात्म्याची एकभावे प्रार्थना करतो.''

महाराजांच्या वरील भाषणावरुन प्रजेच्या सुखासाठी, कल्याणासाठी व त्यांच्या समृद्धीत भर पडावी याच एकमेव उद्देशाने आपण राज्यकारभार करणार आहोत. त्याकामी त्यांनी सर्वांच्या मदतीची अपेक्षा व्यक्त केली आहे.

**शाहू महाराजांचे शैक्षणिक कार्य :**

शिक्षण न घेतल्यामुळे समाजाची कशी प्रगती झाली नाही हे सांगताना महाराज म्हणतात की, ''शिक्षणानेच आमचा तरणोपाय आहे, असे माझे ठाम मत आहे. शिक्षणाशिवाय कोणत्याही देशाची प्रगती/उन्नती होऊ शकत नाही असे इतिहास सांगतो. अज्ञानात बुडून गेलेल्या देशात उत्तम मुत्सद्दी व लढवय्ये वीर कधीही निपजणार नाहीत. म्हणूनच सक्तीचे व मोफत शिक्षणाची हिंदुस्थानला अत्यंत आवश्यकता आहे. या बाबतीत आमचा गतकाळ म्हटला म्हणजे इतिहासातील एक अंधारी रात्र आहे. फक्त एकाच जातीने विद्येचा मस्का घेतला जातो. मनू आणि त्यांच्या मागून झालेल्या शास्त्रकारांनी त्या काळाच्या व वेळेच्या ध्येयाला अनुसरुन निरनिराळ्या जातीच्या व्यवहारास बंधनकारक असे निर्बंध रचिले आणि कमी जातीच्या लोकांना विद्या मंदिराचे दरवाजे बंद करण्यात आले. त्यांचे स्वत:चे धर्मग्रंथ आणि वेद हे सुद्धा वाचण्याची त्यांना मनाई होती. हिंदू धर्माशिवाय इतर कोणत्याही धर्माने अशा आंधळ्या व दु:खकारक परिणाम करण्याबद्दल प्रमुखता मिळवली नाही.''

महाराजांच्या वरील विचारावरुन असे सांगता येते की, शिक्षण म्हणजेच सर्वांगिण प्रगतीचा पाया. तसेच समाज परिवर्तनाचे माध्यम व शिक्षणाला समाजात कोणते स्थान आहे, त्याचे सविस्तर वर्णन वरील भाषणातून व्यक्त होते. महाराजांचे शैक्षणिक कार्य खालीलप्रमाणे

**१) प्राथमिक शिक्षण सक्तीचे :**

महाराजांनी सामाजिकदृष्ट्या मागासलेल्या वर्गात शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी मोठा हातभार लावला. त्याचप्रमाणे माध्यमिक, उच्च शिक्षण व तांत्रिक शिक्षणाच्या सोयी उपलब्ध करुन दिल्या. सन १९१७ साली प्राथमिक शिक्षणाचे महत्त्व ओळखून प्राथमिक शिक्षणासा प्रसार करण्याचे ठरविले. महाराज म्हणतात की, ''प्राथमिक शिक्षणावर माझा भर आहे, तरी दुय्यम व उच्च शिक्षणाकडे माझे लक्ष कमी नाही. माझ्या रयतेमध्ये प्राथमक व उच्च शिक्षणाचा प्रसार करण्याची माझी इतकी जोराने खटपट चालली आहे. यावरुन शक्य तितक्या लवकर रयतस स्वराज्य देण्याचे माझे धोरण आहे हे आपल्या ध्यानी येईलच. माझी सर्व प्रजा मराठी तिसरी इयत्ता शिकून तयार झाली असली तर त्यांना राज्यकारभाराचे हक्क आनंदाने देऊन मी आजच विश्रांती घेतली असती.... पण माझी प्रजा ही जबाबदारी घेण्याअगोदर पूर्णपणे नसली तरी अंशत: तरी पात्र झाली पाहिजे. म्हणजे रयतेतील थोडासा भाग पूर्ण सुशिक्षित होण्यापेक्षा सर्व रयतेला प्राथमिक शिक्षणाचा थोडातरी अंश मिळाला पाहिजे... याकरिता अधिकार दान करण्यापूर्वी सर्व लोकांत विद्याप्रसार करण्याकडे अगोदर लक्ष देणे जरुर आहे.

महाराजांनी २१ डिसेंबर, १९१७ साली आणखी एक महत्त्वाचा निर्णय घेतला व तो म्हणजे सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा कायदा पास झाला. सुरुवातीच्या काळात सक्तीच्या व मोफत प्राथमिक शिक्षणासाठी दरबाराने पाऊण लाख रुपये खर्च करण्याचे ठरविले. पण पुढे सन १९२१-२२ मध्ये या

योजनेवर तीन लाख रुपये खर्च करण्यात आले. या वर्षात संस्थानातील शाळांची संख्या ४२० इतकी झाली. त्यातून जवळजवळ २२००० विद्यार्थ्यांना शिक्षणाचा लाभ मिळाला.

**२) वसतीगृहाची स्थापना:**

माधवराव श्रीपतराव शिंदे यांनी महाराजांना 'भारतातील विद्यार्थी वसतीगृहाचे आद्य जनक अशी उपाधी त्याचे एकूण कार्य पाहून दिलेली आहे. नाशिक येथील 'उदाजी मराठा' वसतीगृहाची कोनशिला बसविताना १५ एप्रिल १९२० रोजी महाराज आपल्या भाषणात म्हणाले की, ब्रिटिश पार्लमेंटला 'मदर ऑफ पार्लमेंटस्' असे मोठ्या अभिमानाने इंग्रज व इतर लोक म्हणतात. त्याचप्रमाणे कोल्हापूरास 'मदर ऑफ बोर्डिंग हौसींग' म्हणजे 'विद्यार्थी वसतीगृहाची माता' असे सार्थ यश मिळाले आहे.

महाराजांनी विविध जातीतील विद्यार्थ्यांच्यासाठी वेगवेगळी वसतीगृहे स्थापन केली. सन १८९६ मध्ये राजाराम कॉलेजला जोडून वसतीगृह सुरु केले. पण त्यात केवळ ब्राह्मण विद्यार्थ्यांनांच प्रवेश दिला जाई. जातवार वसतीगृहे काढली तरी त्यांच्यात अलगपणाची भावना राहू नये म्हणून त्यांनी ही वसतीगृहे शेजारी-शेजारी ठेवण्याची योजना केली.

महाराजांनी अनेक वसतीगृहे स्थापन करुन त्यांना जागा, पैसा, पुस्तके, अनुदान अशाप्रकारचे सहाय्य केले. कोल्हापूरात व्हिक्टेरिया मराठा बोर्डिंग (सध्याचे श्री. शाहू छत्रपती बोर्डिंग) दिगंबर जैन बोर्डिंग, मुस्लिम बोर्डिंग, वीरशैव लिंगायत बोर्डिंग, मिस क्लार्क होस्टेल, आर्य समाज गुरुकूल, वैश्य बोर्डिंग, पांचाळ ब्राह्मण बोर्डिंग, सारस्वत बोर्डिंग, इंडियन ख्रिश्चन होस्टेल, ढोरचांभार बोर्डिंग, शिवाजी वैदिक विद्यालय बोर्डिंग अशा वीस वसतीगृहाची स्थापना करुन सर्व जाती जमातीतील विद्यार्थ्यांना शिक्षण घेताना त्यांच्या राहण्या-जेवण्याची सोय महाराजांनी केली.

**३) स्त्री शिक्षणाला चालना:**

स्त्रियांच्या मागासालेल्या जीवनाचे खरे कारण शिक्षणाचा अभाव हे महाराजांना कळून चुकले होते. म्हणून महाराजांनी राजाराम कॉलेजात शिक्षण घेणाऱ्या स्त्रियांना फी माफीची सवलत दिली. इंदुमती राणीसाहेबांच्या शिक्षणाची खास व्यवस्था केली. त्यांनी मिस लिटलनंतर शिक्षणाधिकारी म्हणून श्रीमंत कृष्णाबाई केळवकर यांची नेमणूक केली. स्त्रियांना शिक्षण दिल्याने कुटूंबाचा व पर्यायाने संस्थानचा विकास साध्य करता येईल असे स्पष्ट मत महाराजांनी व्यक्त केले.

**४) राजाराम कॉलेज:**

सन १८८१ साली राजाराम कॉलेज सुरु झाल्यावर सरकारकडून व इतरांच्याकडून खर्चासाठी निधी मिळत असे. तो बंद झाल्यावर महाराजांनी दरबाराकडून दरसाल ५०,०००/- रुपये अनुदान दिले जाई. पण पुढे हे कॉलेज आर्य समाजाकडे सोपविण्यात आले.

**५) व्यावसायिक शिक्षणाची सुरुवात:**

शाहू महाराजांनी व्यवसायिक शिक्षणाचे महत्त्व ओळखून 'पाटील स्कूल', 'तलाठी स्कूल' चा अभ्यासक्रम सुरु केला. या स्कुलमधून गावांचा कारभार पाहणाऱ्या पाटील व तलाठ्यांना प्रशासनाच्या दृष्टिकोनातून जमाखर्च, कायदे, शांतता, सुव्यवस्था आणि महसुलाबाबतचे प्रशिक्षण दिले जाऊ लागले. प्राथमिक शिक्षणाच्या प्रसारासाठी शिक्षकांच्या प्रशिक्षणासाठी 'प्रशिक्षण केंद्र' सुरु केले. तांत्रिक शिक्षणासाठी जयसिंगराव घाटगे 'टेक्निकल इन्स्टिट्यूट' स्थापन केले. त्याचप्रमाणे लष्करी शिक्षणासाठी इन्फंट्री स्कूल स्थापन केले.

**६) शिक्षकाची भरती:**

सन १९१८ च्या हुजूर आज्ञेत शिक्षकांच्या नेमणुका करताना चांगल्या वर्तणुकीचा दाखला, पंचवीसच्या आतील वाची अट व परिक्षेत पास होऊन वर येणाऱ्यांच्या ाजागा भराव्यात असे स्पष्ट राजर्षी शाहू महाराजांचे होते.

**७) शासकीय नोकऱ्यात ५०% आरक्षण:**

राजर्षी शाहू महाराजांनी २६ जुलै १९०२ रोजी क्रांतीकारी जाहीरनामा पास करुन सरकारी नोकऱ्यात शेकडा ५०% जागा मागासलेल्या वर्गातून भराव्यात. असा जाहीरनामा पास केला. त्यामुळे त्यांना नविन युगाच्या आगमनाची घोषणा करणारा अग्रदुत म्हणून संबोधले जाते.

अशाप्रकारे राजर्षी शाहू महाराजांचे शैक्षणिक सुधारणाचा अभ्यास केल्यावर असे समजून येते की, महाराज हे मोठ्या तळमळीने आपल्या प्रजेच्या उद्धारासाठी, विकासासाठी, शिक्षणाचा प्रसार व्हावा म्हणून झटत होते. यांची पूर्ण कल्पना साध्य होते.

**संदर्भ सूची :**


१) गर्गे, स. मा., भारतीय समाजविज्ञान कोष', खंड ३, मेहता पब्लिकेशन हाऊस, पुणे, १९८१, पृ. ३९२.
२) परिवर्तनाचा वाटसरु, दि. १६ ते ३० जून २०१३, पृ. ५८.
३) सुर्यवंशी, कु. गो., 'राजर्षी शाहू राजा व माणूस', ठोकळा प्रकाशन, पुणे, १९९४,पृ. ४२६.
४) अत्रे, त्रि. ना, 'गावगाडा', मोरे प्रकाशन, मुंबई, १९५९, पृ. ८६.
५) गौतम प्रज्ञावंत (संपा.), 'शाहू राजा', दि राहूल पब्लिकेशन, कोल्हापूर, १९९१, पृ. १२४.
६) जयसिंगराव पवार (डॉ.), 'राजर्षी शाहू छत्रपती जीवन व कार्य', महाराष्ट्र इतिहास प्रबोधनी, कोल्हापूर, २०१२, पृ. ८६.